**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७७/२०२०** | **दिनांक २५/०९/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १९/०९/२०२० ते २५/०९/२०२०)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक २६/०९/२०२० सकाळी ८:३० पासून ३०/०९/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१९/०९** | **२०/०९** | **२१/०९** | **२२/०९** | **२३/०९** | **२४/०९** | **२५/०९** | | **२६/०९** | **२७/०९** | **२८/०९** | **२९/०९** | **३०/०९** |
| १.० | ३.० | ३७.४ | १८.६ | ६७.८ | २७.२ | - | **पाऊस (मिमी)** | ३० | ४ | ३ | ० | ० |
| २८.४ | २८.८ | ३१.० | ३०.४ | ३०.८ | २७.२ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३२ | ३२ | ३२ | ३२ |
| २३.२ | २३.० | २३.२ | २२.५ | २२.८ | २३.४ | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २४ | २४ | २४ | २५ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ९० | ९२ | ९७ | ९३ | ९० | ९५ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९४ | ९२ | ९३ | ९३ | ९२ |
| ९० | ९१ | ८६ | ८३ | ८७ | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ८२ | ७३ | ७० | ६८ | ६७ |
| १.९ | ०.३ | २.६ | १.९ | ४.० | ३.८ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ४ | ४ | ४ | ४ | ३ |
| शांत | वा.प. | शांत | शांत | ऊ. | ई.पू. | - | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | आ.द. | पू. | आ.पू. | आ. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **१५५.०** | **२७५८.६** | **५१९७.२** |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्हयातील काही ठिकाणी दिनांक २६ सप्टेंबर, २०२० रोजी मध्यम स्वरूपाच्या आणि दिनांक २७ ते २८ सप्टेंबर, २०२० दरम्यान हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे. |
| **इशारा** | रायगड जिल्ह्याकरिता जोरदार पाऊसाची कोणतीही चेतावणी नाही. |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक २ ते ८ ऑक्टोबर, २०२० दरम्यान सरासरीपेक्षा कमी पाऊसाची शक्यता आहे. |

| **पिक** | **अवस्था** | **हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पोटरी ते फुलोरा अवस्था (गरव्या जाती), फुलोरा ते दाणे भरणे अवस्था (निमगरव्या जाती) आणि दाणे भरणे ते परिपक्वता अवस्था (हळव्या जाती)** | • दिनांक २६ सप्टेंबर २०२० रोजी जिल्हयातील काही ठिकाणी मध्यम पाऊसाचा अंदाज असल्याने तयार झालेल्या हळव्या भात पिकाची कापणी शक्य असल्यास पुढे ढकलावी आणि दिनांक २७ सप्टेंबर २०२० नंतर हळवे भात पिकाची कापणी जमिनीलगत करण्यात यावी. कापणी केलेले भात पिक लगेच मळणी करून धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे.<br>• गरवे आणि निम गरवे भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• हळवे भात परिपक्व अवस्थेत असल्यास कापणीपूर्वी ८ ते १० दिवस खाचरातील पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• गरवे भात पिक फुलोऱ्या अवस्थेत असताना देण्यात येणारी नत्र खताची तिसरी मात्रा २८ किलो युरिया प्रती एकरी पाऊसाची उघडीप असताना देण्यात यावी.<br>• आर्द्रतेत वाढ संभवत असल्याने दुधाळ अवस्थेत असलेल्या निमगरव्या भात पिकावर लोंबीवरील ढेकण्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. भात पिक दुधाळ अवस्थेत असताना प्रौढ ढेकण्या व त्याची लहान पिल्ले दाण्याला छिद्र पाडून आतील रस शोषून घेतात. त्यामुळे दाणे पोचट राहतात आणि लोंब्या अर्धवट भरतात. अशा दाण्यावर एक सूक्ष्म छिद्र दिसून येते व छिद्राभोवती काळपट, तपकिरी ठिपका तयार होतो. किडीच्या नियंत्रणासाठी बांधावरील गवत कापून बांध स्वच्छ ठेवावेत. पिक दुधाळ अवस्थेत असताना प्रति चूड एक ढेकण्या आढळून आल्यास नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही ९ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे किंवा १.५ टक्के क्लोरपायरीफॉस भुकटी ८ किलो प्रति एकरी सायंकाळी किंवा सकाळी लवकर वारा शांत असताना आणि पाऊसाची उघडीप असताना धुरळावी (टीप: किटकनाशकास लेबल क्लेम नाहीत.).<br>• पुढील पाचही दिवस आर्द्रतेत वाढ संभवत असल्याने गरव्या भात पिकावर कडा करपा ह्या जीवाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. कडा करपा रोगामुळे पानांचे शेंडे आणि कडा पिवळसर रंगाच्या होतात व रोगग्रस्त रोपांची पाने कडेकडून मध्य शिरेच्या दिशेने करपतात. सकाळच्या वेळेस पानांच्या खालच्या बाजूला दुधाळ रंगाचे दवबिंदू साचलेले दिसून येतात. रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी स्टेप्टोसायक्लीन ५ ग्रॅम आणि कॉपर ऑक्सिक्लोराईड २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून एकत्रित फवारणी करावी. (सदर बुरशीनाशके लेबल क्लेम नाहीत). |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • मागील काही दिवसांपासून असलेले ढगाळ वातावरण, वाढलेली आर्द्रता आणि कमी सूर्यप्रकाश यामुळे बुरशीला पोषक |

| | | |
|---|---|---|
| | | वातावरण निर्माण झाल्यामुळे काजूची पानगळ आणि फांद्याची मर दिसून येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी मन्कोझेब ०.२% बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडांवर फवारणी पाऊसाची उघडीप पाहून करावी. पुढील फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी. |
| **सुपारी** | **फळधारणा** | • सुपारीवर कोळेरोग बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव हवेतील आर्द्रता वाढल्यामुळे फळांच्या देठावर दिसून येण्याची शक्यता असून रोगामुळे फळांची मोठ्या प्रमाणात गळ होते. कोळेरोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रणाची किंवा ०.३७५ टक्के कॉपर ऑक्झीक्लोराईड ३७ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण करून फवारणी पानांचा बेचक्यात करावी. |
| **भाजीपाला पिके** | **पेरणी** | • रब्बी हंगामासाठी वांगी, मिरची, टोमेटो आणि इतर भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता जमीन वाफसा स्थितीत असताना मशागत करावी. वाफे तयार करण्याअगोदर जमिनीत चांगले कुजलेले शेणखत ५०० किलो प्रति गुंठा मिसळावे. ३ मी. लांब x १ मी. रुंद x १५ से.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावे. पेरणीच्या वेळेस गादीवाफ्यावर प्रती चौरस मीटर ३५ ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ओफ पोटेश मिसळून १० सें.मी. अंतरावर ओळीने भाजीपाला बियाणांची पेरणी करावी. पेरणी करण्या अगोदर बियाण्या द्वारे पसरणाऱ्या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास थायरम ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे किंवा ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करतेवेळी किंचित पाणी लावून जैविक बुरशीनाशकाचे पातळ आवरण बियाण्याभोवती होईल असे पहावे. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**